| | | |
|---|---|---|
| | **महाळुंगे MIDC पोलीस स्टेशन,**<br>**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय.**<br>**फोन क्रमांकः ७०२८५३५३२३.** | |

# प्रेसनोट दिनांक ०६/०६/२०२३

## " औद्योगिक क्षेत्रातील कंपनी प्रतिनिधी व पिंपरी चिंचवड पोलीस समन्वय बैठक "

दिनांक ०६/०६/२०२३ रोजी सकाळी ११.३० वा. ब्रिज स्टोन कंपनी, पत्ता- मिटींग हॉल, सावरदरी ता. खेड, जि. पुणे, येथे कंपन्यांना भेडसावणारे प्रश्न, वाहतुक समस्या, माथाडी कामगार, युनियन व इतर समस्यांकरीता मा.श्री. विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, यांचे प्रमुख उपस्थितीत पोलीस विभाग व चाकण एमआयडीसी मधील कंपनी व्यवस्थापक यांची बैठक आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. राजेंद्रसिंह गौर, सहाय्यक पोलीस आयुक्त, चाकण विभाग यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली, त्यानंतर श्री.शंकर साळुंखे, यांनी चाकण व महाळुंगे या भागातील एमआयडीसीची माहिती करुन दिली. त्यानंतर बैठकीमध्ये मा.श्री. विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त, मा.श्री. शैलेंद्र पोळ, कामगार आयुक्त, पुणे विभाग, श्री.निखील वाळके, सहाय्यक कामगार आयुक्त, माथाडी बोर्ड, व श्री.चौडेकर, उप अभियंता, एमआयडीसी विभाग, यांनी उपस्थित कंपन्याचे प्रतिनिधींशी थेट संवाद साधुन, त्यांच्या अडी अडचणी जाणुन घेवुन, त्या सोडवण्याचा प्रयत्न केला. **त्यामध्ये विशेषतः औद्योगिक वृध्दीसाठी व गुंतवणुक दारांचे हित व सुरक्षण करणेसाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींवर चर्चा करण्यात आली.** उदा. (कामगार युनियन, माथाडी कामगारांच्या समस्या, माथाडी कामगार कायदा, चरित्र्य पडताळणी, वाहतुक नियोजन व अंमलबजावणी, सीसीटीव्ही कॅमेरे, कचरा, इत्यादी समस्या) या महत्वाच्या विषयांवर चर्चा झाली.

मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी उपस्थित कंपनीचे प्रतिनिधी यांना संबोधित करताना खालील मुद्यांवर मार्गदर्शन केले.

१. औद्योगिक क्षेत्रामधील कंपन्यांचे प्रतिनिधी व पोलीस यांचेमध्ये दिनांक १९/०१/२०२३ रोजी घेतलेल्या बैठकीमध्ये कंपनीचे व्यवस्थापक व सदस्य यांना भेडसावणाऱ्या तक्रारी बाबत न घाबरता पोलीसांकडे तक्रार करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यास पोलीस विभागामार्फत तात्काळ सकारात्मक प्रतिसाद देण्यात आलेला असून प्राप्त तक्रारीनुसार **खंडणीखोरां विरोधात एकुण १२ गुन्हे दाखल करण्यात आलेले असून** संबंधीत सर्व आरोपीतांना तात्काळ अटक करण्यात आली असून त्यांना जेलबंद करण्यात आलेले आहे.

२. तरी देखील कंपनी व्यवस्थापन अधिकारी व सदस्यांना कंपनी संदर्भाने कोणतीही समस्या किंवा अडचण अगर माथाडी कामगारांच्या संबंधी काही तक्रार असल्यास आपण दोन पाऊल पुढे येवून निर्भिडपणे नजीकचे पोलीस स्टेशन, औद्योगिक तक्रार निवारण कक्ष (इंडस्ट्रियल ग्रिव्हियन्स सेल) अथवा कोणतेही वरिष्ठ अधिकारी यांना तक्रार केल्यास त्याची तात्काळ दखल घेवून संबंधीत खंडणीखोरां विरोधात कायदेशीर कडक कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले.

३. औद्योगिक तक्रारीचे तात्काळ निवारण करणेसाठी **औद्योगिक तक्रार निवारण कक्ष (इंडस्ट्रियल ग्रिव्हियन्स सेल)** पिंपरी चिंचवड आयुक्तालयामध्ये खंडणी विरोधी पथकाअंतर्गत स्थापन केले आहे.

४. सदर तक्रार ही औद्योगिक तक्रार निवारण कक्ष (इंडस्ट्रियल ग्रिव्हियन्स सेल) येथे **E-mail** - **indgrevcell-pcpc@mah.gov.in** अथवा **Whatsapp** क्रं. **9529691966** अथवा डायल ११२ या क्रमांकावर कळविल्यास तात्काळ कार्यवाही करण्यात येईल.

५. औद्योगिक क्षेत्रामध्ये जास्त मनुष्यबळ उपलब्ध करुन गुन्हयांना आळा बसविणे व अधिक सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयात एक अपर पोलीस आयुक्त व दोन पोलीस उप आयुक्त या पदाची निर्मिती करण्याकरीता शासनास प्रस्ताव सादर केला असुन तो अंतिम

टप्पात आहे. औद्योगिक क्षेत्रासाठी पोलीस उप आयुक्त यांचे अधिनस्त स्वतंत्र परिमंडळाची स्थापना करण्याचे नियोजीत आहे.

६. महाळुंगे एमआयडीसी पोस्टे करीता एचपी चौक, येथे एमआयडीसी विभागाकडुन मिळालेल्या जागेत अद्यावत- हाय टेक असे पोलीस स्टेशन उभारण्याकरीता शासनाकडे प्रस्ताव सादर केल्याचे सांगीतले.

७. कंपनी व्यवस्थापन अथवा तक्रारदार यांना आवश्यकता असल्यास त्यांचे तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवण्याची तजवीज पोलीस प्रशासनामार्फत केली जाईल. परंतु जास्तीत जास्त कंपनी यांनी त्रास असल्यास कायद्याची मदत घेवून तक्रार दाखल करण्यास आवाहन केले.

८. औद्योगिक क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात स्थानिक व परप्रांतीय नागरिक नोकरी व इतर कामानिमित्त आपले कंपनीमध्ये काम करत असतात, अशा कामगारांची ऑनलाईन पोलीस व्हेरिफिकेशन करणे बंधनकारक व आवश्यक असुन, कंपन्यांनी विविध कॉन्ट्रॅक्ट, ठेके देताना, त्यात पारदर्शकता ठेवावी तसेच सुरक्षा रक्षक नेमताना त्यांचे पोलीस व्हेरीफिकेशन करुन घ्यावे.

९. कंपनी व्यवस्थापनास ठराविक व्हेंडर यांना स्क्रॅप माल द्यावा, कामाचे कंत्राट द्यावे याकरिता धाक दाखवून दबाव आणत असल्यास त्याबाबत पोलीसांशी संपर्क करावा. प्राप्त तक्रारीची तात्काळ दखल घेवून संबंधीतांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१०. इतर समस्यांपैकी रस्त्यावर घडणारे कामगारांचे अपघात ही महत्वाची समस्या आहे असे मा. पोलीस आयुक्त यांनी सांगितले त्यासाठी कंपनी व्यवस्थापनाने सर्व कामगारांना **हेल्मेट परिधान करणे बाबत प्रोत्साहीत** करावे.

११. औद्योगिक क्षेत्रामध्ये चोरी, इतर काही गुन्हे यापासून प्रतिबंध करणेसाठी कंपनी व्यवस्थापनाने कंपनीच्या आतील भागाप्रमाणेच कंपनीच्या बाहेरील जागेमध्ये, सार्वजनिक रस्त्यावर चांगल्या दर्जाचे हाय डेफिनेशन **सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत आवाहन केले.**

१२. तसेच रस्त्यावर कॅरेज वे वाढण्यासाठी व वाहतुकीची सुलभता होण्यासाठी कंपनी व्यवस्थापनाने त्यांचे कामगारांचे मोटारसायकल व चारचाकी गाड्या ह्या कंपनीचे बाहेर **रोडवर पार्किंग न करता**, कंपनीचे गेटचे आत पार्किंगची सोय करावी.

१३. वाढती गुन्हेगारीस आळा बसविण्याकरीता वासुली फाटा येथे **पोलीस मदत केंद्र** उभारण्यात येणार आहे.

१४. कंपनी व्यवस्थापनास माथाडी कायदे व इतर कामगार कायदे याबाबत विस्तृत अशी माहिती मिळण्याकरीता कामगार व माथाडी विभागाचे अधिकारी यांनी लवकरच कार्यशाळेचे आयोजन करावे, जेणे करुन त्यांना माथाडी व इतर कायद्यांबाबत माहिती मिळेल.

एमआयडीसी भागामध्ये **औद्योगिक वृध्दी होणेसाठी व सुरक्षिततेची भावना अधिक भक्कम करणेसाठी** समन्वय बैठका नियमीत आयोजीत करण्यात येतील. तसेच कंपनी व्यवस्थापनाने कोणत्याही गुंड प्रवृत्तीच्या लोकांबाबत भय अथवा त्यांचे दबावास बळी पडू नये, औद्योगिक क्षेत्रास कसल्याही प्रकारचा त्रास देणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल असे सांगितले.

सदर बैठकीस १) श्री.विनय कुमार चौबे, मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, २) श्री. शैलेंद्र पोळ, मा.कामगार आयुक्त, पुणे विभाग, ३) श्री.राजेंद्रसिंह गौर, मा. सहा. पोलीस आयुक्त, चाकण विभाग, ४) श्री.निखील वाळके, सहाय्यक कामगार आयुक्त, माथाडी बोर्ड, ५) श्री.चौडेकर, उपअभियंता, एमआयडीसी विभाग, तसेच श्री. वसंतराव बाबर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन, श्री. अरविंद पवार, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, खंडणी विरोधी पथक, श्री. वैभव शिंगारे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, चाकण पोलीस स्टेशन हे हजर होते. सोबत चाकण एमआयडीसी मधील महत्वाच्या कंपन्यांचे प्रतिनिधी- मर्सिडीज कंपनीचे श्री. सारंग जोशी, ब्रिजस्टोन कंपनीचे श्री. पौरव मेहता, न्यु हॉलंड कंपनीच्या श्रीमती. शितल साळुंखे, टाटा मेग्ना कंपनीचे श्री. शंकर साळुंखे, मिंडा कंपनी ग्रुपचे श्री. राजदाईंजे, स्पोल ॲटो कंपनीचे सुधीर पाटील व व्हायब्रंट एचआर प्रोफेशनल असोसिएशन पुणे व फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रिजचे प्रतिनिधी, तसेच महाळुंगे व चाकण, एमआयडीसी मधील विविध कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. श्री. वसंतराव बाबर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन यांनी सर्वांचे आभार मानुन, उपस्थित मान्यवरांच्या वतीने बैठक संपली असे जाहीर केले. **नमुद बैठकीकरीता सुमारे २५० कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.**